# भाडे करार दस्त

## विभाग क्र.६.३ प्र.हे. किंमत रु.३५,७०,०००/-

## ज्याचे सरकारी किंमत 1069000/-च्चे 50% टक्के रु प्रमाणे - रु. 5,36000/-

भाडे करार दस्त २९ वर्षा करीता आज रोजी दि.२७/१२/२०२१ ई. रोजी

देशमुख फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ली.
व्यवस्थापकीय संचालक-
सुरेश पि.श्रीराम पावडे
वय ४६वर्षे, धंदा : शेती व व्यापार
रा. वाडी (बु) ता.जि.नांदेड.

लिहुन घेणार
(भाडेकरू )

सुरेश पि.श्रीराम पावडे
वय ४६ वर्षे, धंदा : शेती व व्यापार
रा. वाडी (बु) ता.जि.नांदेड.

लिहुन देणार
(शेत मालक )

कारणे भाडे करार दस्त लिहुन देतो ऐसा जे की, मौजे वाडी (बु.) ता. जी. नांदेड येथील सर्वे क्र.९१ फ क्षेत्रफळ १ हे.००.०० आर. आकार रु.४.५२ पैसे पैकी ० हे ३० आर. लिहुन देणार हे मालक व ताबेदार आहेत. लिहून देणार हे लिहून घेणार यांच्या हक्कात भाडे करार दस्त करून देत आहेत त्या जमिनीच्या चतुर्सिमा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पूर्वेस | :गट क्र.९१ चा उर्वरीत भाग |
| पश्चिमेस | :१०.६७ मी. रुंद रस्ता आहे. गट क्र.९१ चा उर्वरीत भाग आहे. |
| दक्षिणेस | :१०.६७ मी. रुंद रस्ता व पश्चिम वळण रस्ता आहे. |
| उत्तरेस | :गट क्र.९१ चा उर्वरीत भाग |

येणे प्रमाणे वरील चतुर्सिमेच्या आतील ० हे ३० आर शेत जमिनीवर लिहून घेणार यांच्या कंपनीसाठी २२५० मेट्रिक टन धान्य साठवणूक करण्यासाठी गोदाम बांधकाम करणेसाठी वरील नमूद जमीन २९ वर्षासाठी भाडे करारावर देण्यासाठी लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांच्याकडे येऊन विनंती केली असता लिहुन देणार यांनी खालील अटींवर सदरची जमिन ही गोदाम बांधकाम करण्यासाठी भाडे करारावर देण्याची लिहुन घेणार यांची विनंती मान्य केली.

Pawde

1206 2021
3 / 18

पान नं. २ वर..

१. हे की, लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना सदर जमिनीपैकी ० हे ३० आर जमीन गोदाम बांधकाम करणेसाठी २९ वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजे दि. ०१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०५० पर्यंत भाडे करारावर दिले आहे.

२. हे की, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर ० हे ३० आर जमीन गोदाम बांधकाम करणेसाठी जमिनीचे भाडे हे रु८१६७.५ पै. (आठ हजार एकशे सदुसष्ट रुपये पन्नास पैसे) प्रती महिना देण्याचे ठरले आहे व सदरील भाडे प्रत्येक वर्षाला १० टक्के वाढ होईल.

३. हे की, सदर जमिनीचा ग्रामपंचायतचा कर व इतर शासकीय कराचा भरणा लिहून देणार यांनी भरावयाचा आहे.

४. हे की, सदर जमिनीची व त्यावर गोदाम बांधकाम केल्यावर त्या गोदामासाठी लागणारी सर्व आवश्यक कामे व्यवस्था लिहून घेणार करतील व लाईट फिटिंगची देखभालीची व दुरुस्तीची जबाबदारी लिहून घेणार यांची राहील.

५. हे की, सदर जमिनी मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. नांदेड यांचे तर्फे एक विजेची जोडणी स्वतंत्र देण्यात येणार आहे. सदरचे मीटर सुरुवातीला सुस्थितीत असल्याची खात्री लिहून घेणार यांनी करून घेणार आहे. सदर भाडे करार नाम्याच्या मुदतीमध्ये सदर मीटरद्वारे जे काही विजेची जोडणी बाबत वीज कायदा २००३ प्रमाणे कोणतीही कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून घेणार यांची असेल. सदर मीटरचे वीजबिल नियमित भरण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची राहील व वीजबिलाची पावती विनातक्रार लिहून घेणार हे लिहून देणार यांना आणून देतील.

६. हे की, लिहुन घेणार म्हणून प्राप्त झालेला हक्क इतर कोणासही हस्तांतरित करता येणार नाही. गोदाम बांधकाम करणे साठी व इतर काही सरकारी अथवा वखार महामंडल यांच्या योजनेसाठी लागणा-या व्यवसायासाठीच सदरच्या जमिनीचा वापर करण्यासाठी लिहून घेणार बांधील राहतील.

७. हे की, सदर जमिनीच्या आजुबाजुला असणाऱ्या शेजाऱ्यांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन लिहुन घेणार करणार नाहीत. सदर जमिनीच्या रचनेत कोणताही फेरबदल लिहुन घेणार करणार नाहीत.

८. हे की, सदर जमिनीच्या भाडे बाबत कोणत्याही तीन महिन्याचा भरणा लिहून घेणार कडून न झाल्यास लिहून घेणार सदर जमीन तात्काळ रिकामे करून देण्यास लिहून घेणार यांना बांधील राहतील.

९. हे की, ठरलेली मुद्दत संपल्यानंतर किंवा मुद्दती अगोदर लिहून घेणार यांनी सदर जमिनीचा विना तक्रार पूर्ववत, सुस्थितीत रिकामा ताबा लिहून देणार यांना देण्याचे ठरले आहे. सदर भाडे कराराची मुद्दत संपल्यानंतरही जर लिहून घेणार जमिनीचा अथवा गोदामाचा वापर करत असतील तर मुद्दतीनंतरच्या प्रत्येक दिवसाच्या वापराचे रुपये २०००/- दोन हजार रुपये या प्रमाणे लिहून घेणार हे लिहून देणार यांना जमीन रिकामे करून देईपर्यंत देण्यास जबाबदार असल्याचे लिहून घेणार यांना मान्य आहे.

१०. हे की, सदर जमीन लिहून देणार यांना मुद्दती अगोदर रिकामे करून पाहिजे असल्यास लिहून घेणार यांना दोन महिने अगोदर लेखी नोटीस दिली असल्यास लिहून घेणार विना तक्रार सदर गोदाम / जमीन रिकामे करून देतील.

पान नं ३ वर...



JOINT SUB REG...
६२०६
४/१६

११. हे की, तसेच सदर जमीन/गोदाम लिहून घेणार यांना काही वयक्तिक अडचणी मुळे मुदती अगोदर रिकामे करायचे असल्यास ते लिहून देणार यांना दोन महिने अगोदर लेखी नोटीस देऊन नंतर जमीन/गोदाम रिकामे करतील असे बंधनकारक राहील.

१२. हे की, वरील सर्व अटी लिहून घेणार यांच्यावर बंधनकारक राहतील व त्यातील एकाही अटीचा भंग लिहून घेणार यांच्याकडून झाल्यास लिहून देणार सदरचा भाडे करारनामा १५ दिवस अगोदर लेखी नोटीस देऊन रद्द करू शकतात.


१३. हे की, कुठल्याही कारणामुळे स्मार्ट चा शाशकीय प्रकल्प रखडल्यास मूळ मालक काबीज राहतील व लीज रद्द झाली असे समजण्यात येईल व ते वंश परंपरागत वापर व उपभोग घेतील.

१४. सदरील जमीन ही अक्षांश १९.१७६१३ व रेखांश७७.२६७८२६ वर आहे.

१५. सदरील भाडे करारातील जमिनीची GPS Reading N19 10’.619 E070 15’.915

१६. सदरील जमीन हे दुय्यम निबंधक वर्ग १, २ व ३ यांच्या अधिकार व कार्यक्षेत्रातील आहे.

सबब हा भाडे करारनामा दस्त आज रोजी लिहून घेणार आणि लिहून देणार यांनी वाचून समजून मान्य केला आहे.



**साक्षीदार :-**

१)अभय गजाननराव देशमुख वय-२६ वर्षे,
रा. उंचेगाव ता. हदगाव जी. नांदेड.

**लिहुन देणार**

**सुरेश पि.श्रीराम पावडे**
रा. वाडी (बु) ता.जि.नांदेड.

२) गोपीनाथ दिगांबर देशमुख वय-२६,
रा. उंचेगाव ता. हदगाव जी. नांदेड.

**लिहुन घेणार**

**देशमुख फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ली.**
**मार्फत अध्यक्ष –**
**सुरेश पि.श्रीराम पावडे**
रा. वाडी (बु) ता.जि.नांदेड.



ह. द. ग.-२
६२०६ / २०२१
५ / १७